क्र. मुजअ/आरटीआय/ईमेलआयडी/२०२१/No 19222
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
जनसंपर्क विभाग, ४ था मजला, मुख्यालय,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दिनांक : १८ ऑगस्ट, २०२१.

# : परिपत्रक :

**विषय :- महावितरणमधील सर्व विभागांनी ऑनलाईन काम करताना महावितरणच्याच ईमेलआयडीचा वापर करणेबाबत.**

महावितरणचा कारभार पारदर्शी होण्यासाठी व जनतेला महावितरणची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी महावितरणची www.mahadiscom.in ही वेबसाईट तयार करण्यात आली. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने महावितरणच्या सर्व विभागांना माहिती तंत्रज्ञान विभागाकडून ईमेलआयडी तयार करून देण्यात आले. सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांनी महावितरणच्याच ईमेल आयडीचा वापर करावा, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांचे सर्व सार्वजनिक कार्यालयांनी सुरक्षेच्या दृष्टीने त्यांच्याच ईमेलआयडीचा वापर करावा, असे स्पष्ट निर्देश २०१३ पासून आहेत. महावितरण कंपनी ही शासन अखत्यारित कंपनी असल्यामुळे शासन निर्देशानुसार महावितरण सुध्दा महावितरणच्याच ईमेल आयडीचा वापर करीत आहेत.

एखाद्या प्रसंगी काही विभाग, कर्मचारी व अधिकारी महावितरणच्या कार्यालयीन कामाकरिता खाजगी ईमेलचाही वापर करताना दिसतात. कृपया तोही शक्यतोवर टाळून महावितरणच्या सर्व विभागांनी व सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महावितरणचाच ईमेल आयडीचा वापर करावा.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या ई-लायब्ररी पोर्टलवर उपलब्ध आहे.

कार्यकारी संचालक (मानव संसाधन)

प्रति,
**महावितरणचे सर्व कार्यालय, महावितरण.**